Please consider the environment before printing...

दिनांक:- 10 / 03 / 2024

S.N.D. POLYTECHNIC, BABHAULGAON CENTRAL LIBRARY YEOLA DIST. NASHIK

# Death Anniversary of Vishnu Vaman Shirwadkar (Kusumagraj)

# विष्णू वामन शिरवाडकर (कुसुमाग्रज) पुण्यतिथी.




**27 Feb 1912 – 10 Mar 1999**

- **नाव :** विष्णू वामन शिरवाडकर
- **मूळनाव:** गजानन रंगनाथ शिरवाडकर
- **वडिलांचे नाव:** रंगनाथ शिरवाडकर
- **काकांचे नाव:** वामन शिरवाडकर
- **टोपण नाव:** कुसम अग्रज 'कुसुमाग्रज'
- **जन्म :** 27 फेब्रुवारी 1912
- **जन्मस्थान :** नाशिक
- **मृत्यू :** 10 मार्च 1999
- **शिक्षण:** बी.ए. )नाशिक(
- **पुरस्कार:** महाराष्ट्र राज्य सरकार पुरस्कार )मराठीमाती, स्वगत, हिमरेषा, नटसम्राट(, साहित्य अकादमी )नटसम्राट(, ज्ञानपीठ पुरस्कार, पद्मभूषण पुरस्कार, डि.लीट पुरस्कार, नाट्यलेखन पुरस्कार शिवाय कुसुमाग्रज यांच्या नावाने अनेक पुरस्कार साहित्यिकांना दिले जातात.

## कुसुमाग्रजांचे बालपण आणि कौटुंबिक माहिती?

कुसुमाग्रज यांचे मूळ विष्णू वामन शिरवाडकर हे आपण सगळेच जाणतो. पण कुसुमाग्रजांचे खरे नाव गजानन रंगनाथ शिरवाडकर. त्यांचे काका वामन शिरवाडकर यांनी त्यांना दत्तक घेतल्यामुळे त्यांचे नाव हे बदलून विष्णू वामन शिरवाडकर असे करण्यात आले. त्यांचा जन्म नाशिकचा त्यांचे शिक्षणही नाशिकमध्येच झाले. कुसुमाग्रजांचे वडील म्हणजेच वामन शिरवाडकर हे व्यवसायाने वकील होते. कामानिमित्त ते पिंपळगावमधील बसवंत या गावी आले आणि तेथेच स्थायिक झाले. त्याच ठिकाणी त्यांचे संपूर्ण बालपण गेले. विष्णूंना सहा भाऊ आणि कुसुम नावाची एक बहीण होती. तिचा भाऊ म्हणजेच कुसुम अग्रज म्हणून त्यांनी त्यांचे टोपण नाव 'कुसुमाग्रज' असे ठेवले. त्यांचे प्राथमिक शिक्षण पिंपळगावला तर माध्यमिक शिक्षण हे त्यांनी नाशिकमधून केले. पुढील मॅट्रिक शिक्षण त्यांनी मुंबई विद्यापीठातून केले. शालेय शिक्षण घेत असताना त्यांची पहिली कविता प्रकाशित झाली. 'रत्नाकर' नावाच्या मासिकातून ती प्रसिद्ध करण्यात आली. शिक्षण पूर्ण केल्यानंतर चित्रपट व्यवसायात पटकथा लिहिण्याचे काम केले. यासोबतच त्यांनी विविध वृत्तपत्रांमध्ये आणि नियतकालिकांमध्ये वृत्त संपादनाचे कामही केले. स्वराज्य, प्रभात, नवयुग, धनुर्धारी ही ती काही वृत्तपत्र आणि नियतकालिके. मराठीवर आणि लिखाणावर प्रेम असणारे कुसुमाग्रज ज्यावेळी पत्रकारितेच्या निमित्ताने मुंबईत आले त्यावेळी त्यांची भेट मराठी साहित्य संघाच्या डॉ. अ. ना. भालेराव यांच्याशी झाली मराठी साहित्याची होणारी दूरवस्था त्यांना सांगून कुसुमाग्रजांकडून त्यांनी दर्जेदार साहित्य निर्मितीला प्रेरणा दिली. त्यातून प्रेरणा घेतच ते एक उत्तम नाटककार म्हणून नावारुपाला आले. त्यांच्या कविता, कथा या फारच प्रसिद्ध आहेत. त्यांची ओळख एक नाटककारपेक्षा कवी म्हणून अधिक नावारुपाला आलेली आहे. संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनातही त्यांचा सक्रिय सहभाग होता. त्यांच्या साहित्यातून कायमच आधुनिकतेचे एक वलय दिसून आहे. बुरसटलेल्या विचारांना बगल देत त्यांनी साहित्यात नव क्रांती घडवून आणली म्हणूनच त्यांना 'आधुनिक युगाचे कवी' म्हणतात.

## कुसुमाग्रज आणि साहित्य:

कुसुमाग्रजांच्या साहित्याविषयी बोलायचे झाले तर ते शब्दात अपुरे पडतील असे आहे. त्यांच्या कविता, कथा, नाटकांविषयी लिहिण्यासारखे बरेच काही आहे. आजही त्यांच्या कविता या अनेकांच्या ओठी असतात आणि त्या जगण्याची नवी प्रेरणा देतात. पण त्यांच्या एकूण साहित्याचा विचार करता त्यांचे वर्गीकरण केले तर ते जाणून घेणे अधिक सोपे ठरेल.

**कविता:** कुसुमाग्रजांच्या अनेक कविता या फारच प्रसिद्ध आहेत. आजही त्यांचे कविता संग्रह अभ्यासले जातात. अक्षरबाग(१९९९),किनारा(१९५२), चाफा(१९९८),छंदोमयी (१९८२),जाईचा कुंज (१९३६),जीवन लहरी(१९३३),थांब सहेली (२००२),पांथेय (१९८९),प्रवासी पक्षी (१९८९),मराठी माती (१९६०),महावृक्ष (१९९७, माधवी(१९९४), मारवा (१९९९), मुक्तायन (१९८४). मेघदूत(१९५६), रसयात्रा (१९६९),वादळ वेल (१९६९),विशाखा (१९४२),श्रावण (१९८५),समिधा ( १९४७),स्वगत(१९६२), हिमरेषा(१९६४)

**नाटक:** शिरवाडकरांची अनेक नाटकं सुद्धा फारच प्रसिद्ध आहेत

शिरवाडकरांच्या स्वतंत्र नाटकांत दुसरा पेशवा(१९४७),कौंतेय(१९५३),आमचं नाव बाबुराव (१९६६), ययाति आणि देवयानी(१९६६), वीज म्हणाली धरतीला (१९७०), नटसम्राट (१९७१) यांचा समावेश होतो.

Jagdamba Education Society's SND POLYTECHNIC KNOWLEDGE PERSPECTIVE UNDERSTANDING

दूरचे दिवे(१९४६), वैजयंती(१९५०), राजमुकुट(१९५४), ऑथेल्लो(१९६१)व बेकेट(१९७१) ही त्यांची काही रुपांतरीत नाटकं आहेत.

**कथासंग्रह:** इतकेच नाही तर त्यांनी लिहिलेले कथासंग्रह देखील फारच गाजले आहेत. अंतराळ, अपाईंमेंट, एकाकी तारा, काही वृद्ध काही तरुण, जादूची होडी, प्रेम आणि मांजर, फुलवाली, एकाबारा निवडक कथा, सतारीचे बोल

Jagdamba Education Society's
SND POLYTECHNIC
S.N.D. POLYTECHNIC, BABHAULGAON CENTRAL LIBRARY YEOLA DIST. NASHIK
KNOWLEDGE PERSPECTIVE UNDERSTNING

LIBRARIAN
MR.U.D. MULANI
SND POLYTECHNIC
YEOLA-423401

PRINCIPAL
PROF.U.B JADHAV
SND POLYTECHNIC
YEOLA-423401